दिनविशेष...
१९६० : महाराष्ट्रदिन, कामगारदिन. (महाराष्ट्र राज्याची निर्मिती १ मे १९६० पासून.)
१७३९ : चिमाजीअप्पांनी सैन्यासह वसईवर हल्ला केला.
१८६२ : मुंबई विद्यापीठाचा पहिला पदवीदान समारंभ.

# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | ८०२४२.२४ | -४६.१४(०.०५७%) |
| डॉलर | ₹ ८४.६१ | |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४६ | २६ |
| दिल्ली | ३८ | २८ |
| मुंबई | ३२ | २८ |
| नागपूर | ४३ | २५ |
| पुणे | ४१ | २२ |

epaper.shauryamarathi.com | जळगांव | गुरुवार, दि. १ मे २०२५ | वर्ष १ ले | अंक १७६ | किंमत : ५ रु. | पाने ४

# मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांविरोधात फसवणुकीची तक्रार

**वृत्तसंस्था । श्रीरामपूर**

**महायुती सरकारचे नेतृत्व करणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याविरोधात श्रीरामपूर पोलिस ठाण्यात शेतकरी महिलांनी तक्रार दिली आहे. तसेच गुन्हा नोंदवण्याची मागणी शेतकरी महिला सुनिता वानखेडे, कोमल वानखेडे यांनी केली आहे.**

## • लाडक्याबहिणींनी वाढविले महायुतीचे टेन्शन

महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची जुलै महिन्यात घोषणा केली. त्याअंतर्गत पात्र ठरणाऱ्या महिलांच्या अकाऊंटमध्ये दर महिन्याल १५०० रुपये जमा होतात. तर विधानसभा निवडणुकीनंतर महायुतीचं सरकार पुन्हा सत्तेत आल्यास हा हप्ता २१०० करू असं आश्वासनं महायुतीच्या नेत्यांनी निवडणूक प्रचारादरम्यान दिले होते. आता राज्यात महायुती सरकार आले असून, शंभर दिवसांपेक्षा जास्त कालावधी झाला आहे. तरी देखील लाडकी बहीण योजनेचे अनुदान वाढवलेलं नाही. त्यामुळे राज्यातील लाडक्या बहिणी आक्रमक झाल्या असून महायुती सरकारच्या विरोधात अहिल्यानगरमधील श्रीरामपूर पोलिस ठाण्यात फसवणूक केल्याची तक्रार दाखल केली आहे. शेतकऱ्यांनी कर्जमाफीवरून दाखल केलेल्या तक्रारीनंतर आता शेतकरी महिलांनी महायुती सरकारविरोधात फसवणुकीची तक्रार दाखल केली आहे.

दरम्यान, श्रीरामपूर पोलिसांनी शेतकरी महिलांचा तक्रारी अर्ज दाखल करून घेतला असून, पुढं काय कारवाई होणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागून आहे.

**तक्रार अर्जात नेमकं काय म्हटलंय?**

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीत राज्यातील लाडक्या बहिणींना आश्वासन दिलं होते की,



सरकार येताच माझी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत २१०० रुपये दर महिना अनुदान देऊ, पणं निवडून सत्तेत येताच महायुतीने (पान २ वर)

# पाकिस्तान आर्थिक कोंडीच्या विळख्यात

## • हवाई क्षेत्र बंद केल्याने करोडोंचे होत आहे नुकसान

**वृत्तसंस्था । जम्मु काश्मिर**

**पहलगाममध्ये झालेल्या हल्ल्यानंतर भारतकडून पाकिस्तानाविरोधात कठोर निर्णय घेण्यात आले. सिंधू जल करार रद्द करण्यासह अटारी बॉर्डर तत्काळ प्रभावाने बंद करण्यात आली, पाकिस्तानी नागरिकांना मिळणारा सार्क व्हिसा रद्द करण्यात आला आहे. असे एकुण पाच निर्णय घेण्यात आल्याने भारताने पाकिस्तानची चांगलीच कोंडी केली आहे.**



दुसरीकडे पाकिस्तानकडून देखील भारताविरोधात काही निर्णय घेण्यात आले. त्यातील एक निर्णय म्हणजे भारतीय विमानांसाठी पाकिस्तानच्या हवाई हद्दीत प्रवेशास मनाई करण्यात आली आहे. मात्र पाकिस्तानच्या या निर्णयाने त्यांनाच मोठा फटका बसल्याचे समोर आले आहे. पाकिस्तानला नुकसान होण्याचे मुख्य कारण म्हणजे दिल्ली, अमृतसर, लखनऊ आणि जयपूर सारख्या उत्तर भारतातील शहरांमधून युरोप, मध्य पूर्व, अमेरिका, कॅनडा यासारख्या देशांसाठी उड्डाणे पाकिस्तानच्या हवाई क्षेत्रातून जातात. भारतीय विमाने आता पाकिस्तानवरून जात नसल्याने त्या हवाई क्षेत्रातून जाणाऱ्या भारतीय विमानांकडून आकारण्यात येणारे ओव्हरफ्लाइट शुल्क आता पाकिस्तानला मिळणार नाही. शिवाय, दक्षिणपूर्व आशियासाठी उड्डाण करणाऱ्या पाकिस्तानी विमान कंपन्यांना भारताला टाळून लांबचा मार्ग स्वीकारावा लागेल. असे केल्याने शेजारील देशाचा खर्चही वाढेल. या निर्णयामुळे पाकिस्तानला लाखो डॉलर्सचे नुकसान सहन करावे लागणार आहे. यापूर्वी २०१९ मध्ये भारताने कश्मीरमधील कलम ३७० रद्द केले होते. त्यावेळीही पाकिस्तानने हवाई मार्ग बंद केला होता. भारतीय विमान कंपन्यांचे ७०० कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. भारताने पाकिस्तानला हवाई मार्ग बंद केल्यानंतर पाकिस्तानच्या विमान कंपन्यांचे ४०० कोटी रुपयांचे नुकसान झाले. अहवालानुसार, पाकिस्तानचे दररोज ५.४ कोटी रुपयांचे मोठे नुकसान झाले. पुलवामा दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानने आपले हवाई क्षेत्र बंद केल्याने त्यांचे १०० दशलक्ष डॉलर्सचे नुकसान झाले होते. त्या काळात दररोज होणारी सुमारे ४०० उड्डाणे आणि पाकिस्तानच्या नागरी विमान वाहतूक प्राधिकरण (सीएए) व पाकिस्तान आंतरराष्ट्रीय विमान कंपनी (पीआयए)वर त्या निर्णयाचा विपरीत परिणाम झाला होता. आता पहलगाम हल्ल्यानंतर हवाई क्षेत्र बंद केले गेल्याने पाकिस्तानवर पुन्हा अशीच परिस्थिती ओढवण्याची शक्यता स्पष्ट दिसून येत आहे.

**• निर्णयाचा भारतावरही परिणाम**

दिल्ली, अमृतसर, जयपूर, लखनऊ व वाराणसी यांसारख्या शहरांमधून येणाऱ्या विमानांना लांबच्या मार्गांनी प्रवास करावा लागत आहे. ही विमाने पाकिस्तानवरून उड्डाण करण्याऐवजी, आता अरबी समुद्रावरून म्हणजे लांबच्या मार्गाने प्रवास करत आहेत. भारतीय विमान कंपन्या देखील पर्यायी मार्ग निवडावा लागत असल्याने इंधन खर्च वाढण्याची आणि उड्डाणांच्या वेळेत वाढ होण्याची शक्यता आहे. मात्र, पाकिस्तानला थेट त्यांच्या विमान उत्पन्नाला फटका बसत आहे.

# जातनिहाय जनगणनेला केंद्राचा हिरवा कंदील

**वृत्तसंस्था । मुंबई**

**जातनिहाय जनगणनेच्या मागणीला आता केंद्रातील मोदी सरकारने हिरवा कंदील दर्शवला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कॅबिनेट मीटिंग ऑन पॉलिटिकल अफेअर्सच्या बैठकीत आगामी जनगणनांमध्ये जातींच्या जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

**काँग्रेसच्या युपीए सरकारने अनेक राज्यात जात सर्वेक्षण करुन राजकीय हित साधण्याचा प्रयत्न केल्याची टीका अश्विनी वैष्णव यांनी केली. त्यानंतर, केंद्रीय कॅबिनेट बैठकीत आगामी जनगणनेत जात जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती देखील त्यांनी दिली. विरोधकांकडून शंका उपस्थित होत आहेत. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन हा निर्णय झाल्याचेही विरोधी पक्षातील नेत्यांनी म्हटले.**

केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत माहिती दिली. आगामी बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचा हा मोठा निर्णय मानला जात आहे. तर, विरोधकांकडून सातत्याने होत असलेल्या टीकेलाही या निर्णयातून मोदी सरकारने उत्तर दिलं आहे. मात्र, सरकार जातनिहाय जनगणना करु शकत नाही, असं प्रतिज्ञापत्र सरकारने सुप्रीम कोर्टात यापूर्वी सादर केलं होतं. आता, केंद्रीय कॅबिनेटच्या बैठकीत हा निर्णय कसा झाला, बिहार निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आल्याची टीका वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

काँग्रेस सरकारने जातनिहाय जनगणनेचा विरोध केला आहे. त्यामुळेच, १९४७ पासून देशात जातनिहाय जनगणना करण्यात आली नाही. जातजनगणना करण्याऐवजी जात सर्वेक्षण करण्यात आले.

## सुटीची सूचना

महाराष्ट्र दिन तथा कामगारदिनानिमित्त **दैनिक शौर्य मराठी** कार्यालयाला आज दि.१ मे रोजी सुटी राहिल. त्यामुळे दि.२ मे रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची सर्व वाचक, हितचिंतक व जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.

– मुख्य संपादक

## सुविचार

आयुष्याच्या प्रवासात प्रवास अत्यावश्यक आहे.

सुर्योदय – सुर्यास्त
स.-५:५८ संध्या-६:५१

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
९७,९१०/- १००,०००/-

**केळी भाव**

नवती : २४०० ते २५००
पिल बाग : १०५० ते ११००
कांदे बाग : ----

**कापूस भाव**

७५००/- (प्रति क्विंटल)

## थोडक्यात

### मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी देवेन भारती यांची नियुक्ती

**मुंबई ।** विवेक फणसाळकर यांच्या निवृत्तीनंतर देवेन भारती यांची मुंबईच्या पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. देवेन भारती हे १९९४ बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. सध्या ते मुंबईचे विशेष पोलीस आयुक्त आहेत. सध्या मुंबईचे विशेष पोलीस आयुक्त आहेत. विवेक फणसाळकरांच्या निवृत्तीनंतर देवेन भारती यांच्याकडे मुंबई पोलीस आयुक्तपद देण्यात आलं आहे. विवेक फळसाळकर हे आज ३० एप्रिल रोजी निवृत्त झाले.

### भारतीय सैन्याला फ्रि हँड

**जम्मु काश्मिर ।** पहलगाम हल्लयानंतर भारताने पाकिस्तानविरोधात कठोर कारवाईची तयारी सुरू केली आहे. पंतप्रधान मोदी यांच्या बैठकांमध्ये अंतिम निर्णय घेतला जाणार आहे.

# मोहन भागवतांनी घेतली पंतप्रधानांची भेट

**वृत्तसंस्था । दिल्ली**

दहशतवादी हल्ल्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) सक्रिय झाला आहे. पहलगाम हल्ल्यानंतर लगेचच, संघाने त्यासाठी जबाबदार असलेल्यांना शिक्षा करण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली होती. संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनीही मुंबई आणि दिल्लीतील सभांमध्ये बदला घेण्याचे आवाहन केले होते. यानंतर काल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीनंतर लगेचच मोहन भागवत आणि पंतप्रधान मोदी यांची ही सुमारे दीड तास चाललेली बैठक झाली. नेमकं या बैठकीत काय चर्चा झाली हे मात्र अजूनही गुलदस्त्यात आहेत.

२०१४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकार सत्तेत आल्यानंतर



पहिल्यांदाच संघ प्रमुख पंतप्रधानांना भेटण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी गेले होते. समोर आलेल्या माहितीनुसार, संघप्रमुख आणि पंतप्रधान यांच्यात झालेल्या बैठकीत पहलगाम हल्ल्यावर चर्चा झाली.

संघ आधीच बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारांचा मुद्दा उपस्थित करत आहे आणि आता पहलगाममध्ये धर्माबद्दल विचारल्यानंतर झालेल्या हत्येच्या घटनेमुळे देशभर संताप आहे. मोहन भागवत यांची पंतप्रधानांसोबतची भेटही चर्चेत आहे कारण ते त्यांच्या सभांमध्ये पहलगाम हल्ल्याचा बदला घेण्याचे आवाहन करत आहेत.

# • गणपतीला ११ हजार आंब्यांचा नैवेद्य



पुणे : अक्षयतृतीयेच्या मंगलदिनी दगडूशेठ गणपतीला ११ हजार आंब्यांचा महानैवेद्य दाखविण्यात आला. गणरायाभोवती केलेली आंब्यांची आकर्षक आरास मंदिरावर फुलांनी साकारलेल्या आंब्यांच्या प्रतिकृती मनमोहक ठरत आहे.

# ग्रामपंचायतीने दिली गावकऱ्यांना भन्नाट ऑफर

## • कुटुंबाला विमानाची सफर, १०० किलो तांदूळ मोफत

**वृत्तसंस्था । भंडारा**

**जिल्ह्यातील साकोली तालुक्यातील गटग्रामपंचायतीने गावकऱ्यांसाठी भन्नाट ऑफर्स आणली आहे. या ग्रामपंचायतीला अनेक पुरस्कार प्राप्त आहेत. आणखी एक भन्नाट निर्णय ग्रामपंचायतच्या मासिक सभेच घेण्यात आला आहे. संपूर्ण कुटुंबाला विमानाचा प्रवास करण्यात येणार आहे. भंडारा जिल्ह्यातील वलमाझरी गावाने हा निर्णय घेतला आहे. मात्र, या विमानप्रवासासाठी एका अटीची पूर्तता गावकऱ्यांना करावी लागणार आहे.**




साकोली तालुक्यातील खैरी, वलमाझरी, पिटेझरी आणि आमगाव अशा चार गाव मिळून गटग्रामपंचायत आहे. या ग्रामपंचायतीला आतापर्यंत अनेक पुरस्कार प्राप्त झाले असून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत राज्यस्तरीय तसेच केंद्र शासनाचा स्मार्ट ग्राम पुरस्कार सुद्धा मिळाला आहे. तसेच गावातील कचरा गोळा करून त्यापासुन खत निर्मिती केली जाते. गावं कार्बन न्यूट्रल होण्यासाठी गावात प्रतेक घरी व परिसरात झाडे लागवड केली आहे या ग्रामपंचायत अंतर्गत चारही गावात वर्षभर विविध उपक्रम राबविण्यात येत असून त्याला लोकांचाही तेवढाच भरभरून प्रतिसाद मिळत आहे. गावातील लोकात ही भावना कायम राहावी आणि आपले गाव स्वच्छ, निरोगी, सुंदर व सदा हरित राहण्यासाठी सरपंच पुरुषोत्तम रुखमोडे जनतेसाठी नवनवीन कल्पना राबवित असतात. त्यांच्या या कामाला त्यांचे ग्रामपंचायत पदाधिकारी, कर्मचारी, सचिव, गावातील वरिष्ठ नागरिक आणि गावकरी सहकार्य करीत असतात. खैरी-वलमाझरी ग्रामपंचायतमध्ये २३ एप्रिलला पार पडलेल्या मासिक सभेत एक आगळावेगळा ठराव मांडण्यात आला. या ठरावाची सगळीकडे चांगलीच चर्चा होतेय. सन २०२५-२६ चे सर्व प्रकारचे घर कर व पाणी पट्टी कर व त्यापूर्वीचे सर्व कर दि. १५ मे २०२५ पर्यंत जे लाभार्थी भरतील अशा लाभार्थ्यांचा लकी ड्रॉ काढण्यात येईल. या लकी ड्रॉमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या कुटुंबातील कोणत्याही एका व्यक्तीला नागपूर ते हैदराबाद विमान प्रवास, तिथे राहण्याची व्यवस्था आणि परत येतांना रेल्वेचा वातानुकुलीत प्रवास अशी संधी दिली जाईल. तसेच व्दितीय क्रमांकाला १०० किलो जय (पान २ वर)

# राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार बोर्डात मोठे बदल

**वृत्तसंस्था । मुंबई**

भारत सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल केले आहेत. माजी रॉ प्रमुख आलोक जोशी यांची अध्यक्षपदी निवड झाली आहे. त्यांच्यासोबत बोर्डात एकूण ७ सदस्य असतील. तिन्ही सैन्यातील निवृत्त अधिकाऱ्यांना बोर्डात समाविष्ट करण्यात आले आहे. सरकारने राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल केले आहेत आणि मंडळाची कमान माजी रॉ प्रमुख आलोक जोशी यांच्याकडे सोपवली आहे. माजी वेस्टर्न एअर कमांडर एअर मार्शल पीएम सिन्हा, (पान २ वर)

## संपादकीय

### ग्रामगीता एक आदर्श ग्रामरचना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा जन्म ३० एप्रिल १९०९ रोजी अमरावती जिल्ह्यातील यावली येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव बंडोजी इंगळे व आईचे नाव मंजुळाबाई. त्यांचे मूळ नाव माणिक बंडोजी इंगळे (ठाकूर). लहानपणी वरखेड येथे आजोळी असताना त्यांना आडकूजी महाराज हे गुरुस्थानी लाभले. त्यांनी तुकड्या म्हणे या शब्दांनी अभंगांची सुरुवात करण्याचा सल्ला दिला आणि त्यामुळे माणिक तुकडोजी या नावाने ओळखले जाऊ लागले. बालवयातच साधक आणि शिष्य होण्याची प्रेरणा त्यांनी आत्मसात केली. विदर्भात त्यांचा विशेष संचार असला तरी महाराष्ट्रभरच नव्हे तर देशभर हिंडून ते आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे प्रबोधन करीत होते. एवढेच नव्हे तर जपानसारख्या देशात जाऊन त्यांनी सर्वांना विश्वबंधुत्वाचा संदेश दिला. अंधश्रद्धा निर्मूलन व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी त्यांनी भजनांचा, कीर्तनाचा प्रभावीपणे वापर केला. खंजिरी भजन हा प्रकार त्यांच्या प्रबोधनाचे वैशिष्ट्य होते. आत्मसंयमनाचे विचार त्यांनी ग्रामगीता या काव्यातून मांडले. त्यांनी मराठी व हिंदी भाषांमध्ये विपूल काव्यरचना केली. त्यांची ग्रामगीता, अनुभव सागर भजनावली, सेवा स्वधर्म, राष्ट्रीय भजनावली इत्यादी साहित्यरचना प्रसिद्ध आहे. लहर की बरखा हे त्यांचे हिंदीतील महत्त्वाचे पुस्तक आहे. १९३५ मध्ये त्यांनी अमरावतीजवळ मोझरी येथे गुरुकुंज आश्रम स्थापन केला. या आश्रमाच्या माध्यमातून त्यांनी शिस्तबद्ध कार्यकर्त्यांची फळी तयार केली, जी आजही अखंड सेवा कार्य करत आहे. त्यांच्या कीर्तनातील आते हैं नाथ हमारे हे देशभक्तीपर भजन स्वातंत्र्यसंग्रामात प्रेरणास्रोत ठरले. तुकडोजी महाराजांनी अंधश्रद्धा, जातिभेद आणि सामाजिक विषमतेच्या निर्मूलनासाठी प्रयत्न केले. त्यांनी धर्माचे स्वरूप सामाजिक समरसतेच्या अनुषंगाने नव्याने मांडले आणि अनावश्यक कर्मकांडांचा निषेध केला. विवेकनिष्ठ एकेश्वरवादाच्या विचारांची त्यांनी ठाम भूमिका घेतली. ग्रामोन्नती व ग्रामकल्याण हा त्यांच्या विचारसरणीचा जणू केंद्रबिंदूच होता. ग्रामगीता या ग्रंथातून त्यांनी ग्रामीण समाजासाठी वैचारिक मार्गदर्शन केले. या ग्रंथात त्यांनी ग्रामीण लोकांचे वास्तव, त्यांचे प्रश्न आणि त्यावर उपाय यांचा सखोल विचार मांडला आहे. ग्रामगीता म्हणजेच खेड्यांसाठीची दिशा दाखवणारी गीता आहे. तिच्यामध्ये धार्मिकतेपेक्षा सामाजिक जाणिवा, समता, बंधुता आणि सर्व सजीवांवर प्रेमाचा संदेश आहे. या ग्रंथातून आत्मसंयमन, स्वावलंबन, ग्रामोद्योग, ग्रामस्वच्छता, शिक्षण, नैतिकता आणि लोकनेतृत्व या क्षेत्रात प्रभावी उपाय मांडले. त्यांनी भारत हा खेड्यांचा देश आहे. या तत्त्वावर आधारित सर्वांगीण ग्रामविकासाचे दिशादर्शन केले. गाव सुशिक्षित, सुसंस्कृत व स्वावलंबी व्हावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. ग्रामोद्योगांना चालना मिळावी, गावानेच देशाच्या गरजा भागवाव्यात आणि प्रत्येक गावात प्रचारकांच्या रूपात सक्षम नेतृत्व तयार व्हावे, अशी त्यांची दूरदृष्टी होती. त्यांनी देवभोळेपणा, कालबाह्य अंधश्रद्धा आणि रूढी-परंपरांचा अंत व्हावा यासाठी सातत्याने जनजागृती केली. ग्रामगीता ही केवळ एक धार्मिक नव्हे, तर राष्ट्रहिताचे स्वप्न दाखवणारी समाजपरिवर्तनाची कास धरणारी ग्रंथरूप योजना आहे. ग्रामगीता या ग्रंथामधून आदर्श ग्रामराज्य ही संकल्पना मांडली, जी ग्रामीण भारताच्या समग्र आणि शाश्वत विकासासाठी आजही अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरते. त्यांच्या मते, आदर्श ग्रामराज्य म्हणजे फक्त भौतिक सुखसुविधांनी युक्त गाव नव्हे, तर ते एक श्रमशील, स्वावलंबी, नैतिक मूल्यांनी समृद्ध आणि लोकसहभागावर आधारित सामाजिक व्यवस्था असावी. स्त्रियांचे शिक्षण, सन्मान आणि स्वातंत्र्य यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या मते कुटुंब, समाज व राष्ट्र उभे राहण्यासाठी महिलांचे सशक्तीकरण अत्यावश्यक आहे. युवापिढी बलोपासक, नीतिमान, आणि व्यसनमुक्त व्हावी यासाठी त्यांनी मार्गदर्शनपर लेखन केले. स्वावलंबन, स्वच्छता, नैतिकता, आत्मनिर्भरता, एकोप्याची भावना, लोकशाही व्यवस्थेवर निष्ठा आणि निसर्गसंवर्धन हे त्यांच्या ग्रामराज्य संकल्पनेचे मूळ घटक होते. आज ज्या संकल्पना स्मार्ट व्हिलेज, सस्टेनेबल डेव्हलपमेंट, ग्रामस्वराज्य या नावांनी ओळखल्या जातात, त्यांचे मूळ बीज तुकडोजी महाराजांच्या विचारांमध्येच दडलेले आहे. त्यामुळे त्यांच्या आदर्श ग्रामराज्याच्या संकल्पनेचा अभ्यास आणि अंमलबजावणी ही आजही भारतातील आदर्शवत खेड्यांच्या विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरते. तुकडोजी महाराजांच्या योगदानामुळेच महाराष्ट्रात आणि देशात अनेक सामाजिक सुधारणा घडवून आणल्या गेल्या. महिलांच्या हक्कांसाठी त्यांचे कार्य अत्यंत प्रभावी ठरले. त्यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली आणि त्यांना एकजूट करून शेतमालाच्या बाजारभावावर प्रभाव टाकण्यास प्रवृत्त केले. शिक्षणाच्या संदर्भात केवळ पुस्तकी न राहता जीवनोपयोगी, नैतिकता-आधारित व समाजोन्मुख असावे. गावात सर्वांसाठी आरोग्य, स्वच्छता आणि रोजगार यांची हमी असावी तसेच ग्रामस्थांनी नियमितपणे श्रमदान करावे आणि गावच्या विकासात सहभाग घ्यावा, हे त्यांनी अनेक ठिकाणी प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले. त्यांनी स्वातंत्र्य लढ्याला फक्त राजकीय लढा न समजता, तो सामाजिक क्रांती समजून जनजागृती घडवली. त्यामुळेच राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांना राष्ट्रसंत ही उपाधी बहाल केली. आजही अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ त्यांचे विचार समाजात पोहोचवत आहे. तुकडोजी महाराजांचे कीर्तन, लेखन आणि सामाजिक कार्य हे विचारांची शुद्धता, कार्याची नैतिकता आणि मानवतेची जाणीव करून देणारे आहेत. त्यांच्या जीवनाचे तेज आजही समाजाला दिशा देत आहे. त्यांचे विचार हे काळाच्या कसोटीवर उतरलेले, आजच्या काळातही तितकेच प्रभावी आहेत. महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांना केवळ अभिवादन नव्हे, तर त्यांच्या विचारांचे अनुकरण करणे हीच खरी आदरांजली ठरेल.

# नंदुरबार जिल्ह्यात पाणी संकट

## • तीन प्रकल्प पूर्णपणे कोरडे पडले; १३ पैकी सहा लघु प्रकल्पांनी तळ गाठला

**प्रतिनिधी । नंदुरबार**

**राज्यात उन्हाचा पारा चांगलाच वाढला असून एप्रिल महिन्यात मे हिटचा अनुभव जाणवत आहे. वाढत्या तापमानामुळे राज्यात अनेक ठिकाणी पाणीटंचाई सारख्या समस्या उद्भवू लागल्या आहे. यातच नंदुरबार जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे पाणी टंचाईचे संकट अधिक गडद झाले आहे. त्यामुळे तीन प्रकल्प पूर्णपणे कोरडे पडले असून जिल्ह्यातील निम्म्या लघु जिल्ह्यातील १३ पैकी सहा लघु प्रकल्पांनी तळ गाठला असून केवळ २९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे.**



(फोटो सोर्स-इंटरनेट)

नंदुरबार जिल्ह्यात वाढत्या उष्णतेबरोबर धरणातील पाणी साठ्यातील बाष्पीभवनाच्या प्रमाणातही वाढ झाली असून ग्रामीण भागासाठी संजीवनी असलेल्या लघु प्रकल्पांच्या पाणीसाठ्यामध्ये कमालीची घट झालेली पाहण्यास मिळत आहे. मुळात नंदुरबार जिल्ह्यातील अनेक भागात पाणीटंचाईची समस्या मागील दीड महिन्यांपासून जाणविण्यास सुरवात झाली आहे. यामुळे महिलांना दूरवरून पाणी आणण्यासाठी पायपीट करत जावे लागत आहे. तर हे चित्र आणखी गडद होण्याचे चित्र निर्माण झाले आहे. नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण भागातील लघु प्रकल्पांमधील पाणीसाठा कमी झाला तीन प्रकल्प पूर्णपणे कोरडे पडले आहेत. यात इच्छागव्हा, घोटणेको प.ब. आणि ढोंग या प्रकल्पत शून्य टक्के पाणी आहे. तर उर्वरित मेंदीपाडा २०.२५ टक्के, देवळीपाडा ३८.३०, रकानाला ३९.३६, अमरावतीनाला १३.०६, चौपाळे ५७.५४, सुरी ११.२०, नेसु ४८.२१, चिरडा ५३.०६, धनपूर ५६.५८, भरुवेल ४१.७१ टक्के पाणीसाठा आहे. यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावे; असे आहवान प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

### • लघु प्रकल्पात पाणी साठा

मेंदीपाडा २०.२५ टक्के, देवळीपाडा ३८.३०, रकानाला ३९.३६, अमरावतीनाला १३.०६, चौपाळे ५७.५४, सुरी ११.२०, नेसु ४८.२१, चिरडा ५३.०६, धनपूर ५६.५८, भरुवेल ४१.७१.

### • पाण्याच्या बाष्पीभवनाचा वेग वाढला

जिल्ह्यात तापमान ४३ ते ४४ अंशाच्या वर जात असल्याने पाण्याच्या बाष्पीभवनाचा वेग वाढला असून त्यातून धरणातील पाणीसाठा कमी होत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. यामुळे जिल्ह्यातील १३ लघु प्रकल्पांपैकी सहा लघु प्रकल्पांनी तळ गाठला असून लघु प्रकल्पांमध्ये २८.९८ टक्के इतकाच पाणीसाठा शिल्लक असून येणाऱ्या काळात ग्रामीण भागात तीव्र पाणी टंचाईची समस्या निर्माण होऊ शकते.

## खापर येथील शासकीय विश्रामगृह दुरुस्त करा : मागणी

**प्रतिनिधी । अक्कलकुवा**

तालुक्यातील खापर येथील शासकीय विश्रामगृहाची दुरवस्था झाली आहे. विश्रामगृहाची दुरुस्ती करावी अन्यथा नवीन विश्रामगृह उभारण्यात यावे अशी मागणी आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागात गेल्या वर्षानुवर्षे रिक्त पदांमुळे याठिकाणी कर्मचारी नसल्याने दुरवस्थेत वाढ झाली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाची ही जागा प्रशस्त असून याठिकाणी नवीन विश्रामगृह झाल्यास प्रशासनासाठी विश्रामासाठी योग्य सोय होणार आहे.

## थकित मालमत्ता धारकांसाठी ३१ मे पर्यत शास्ती माफी योजना

**प्रतिनिधी । धुळे**



महापालिकेतर्फे थकबाकीदार मालमत्ता धारकांसाठी १ ते ३१ मे पर्यत शास्ती माफी योजना सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे धुळेकरांना दिलासा मिळणार आहे. तसेच महापालिकेच्या उत्पन्नात देखील भर पडणार आहे.

मनपाच्या मालमत्ता करात ३६ टक्के वरुन ३० टक्के व मालमत्ता करात घसारा धरुन आकारणी करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे संगणक प्रणाली सुरु करणेसाठी उशिर झाल्याने मालमत्ताधारकांना १० टक्के सुटचा लाभ घेता आला नाही . त्यामुळे १ ते ३१ मे पर्यंत फक्त चालु आर्थिक वर्ष सन २०२५-२०२६ च्या चालु मागणी बिलावर मालमत्ता करात १० टक्के देण्यात येईल, असे मनपा आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे पाटील यांनी सांगितले. ३६ टक्के वरुन ३० टक्के यामधील ६ टक्के सुट अधिक १० टक्के (संपूर्ण मे महिन्यातील सुट) अशी एकुण १६ टक्के सुट शहरातील व हद्दवाढ भागातील. मालमत्ताधारकांना मिळणार आहे.

महापालिकेने थकीत कर वसुलीसाठी शास्ती अभय योजनेबरोबरच शनिवार व रविवार सुध्दा भरणा केंद्र सुरु ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. तरी धुळे शहरातील सर्व मालमत्ताधारकांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा. असे आवाहन यावेळी धुळे मनपातर्फे करण्यात आले. तसेच खुले भूखंडावर देखील कर आकारणी करण्यात येणार आहे. असे ही त्यांनी यावेळी सांगितले.

## शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त वैष्णवी मोरेचा सत्कार

**प्रतिनिधी । धुळे**

क्रीडा क्षेत्रातील मानाचा व प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळाल्याबद्दल वैष्णवी बाला मोरे यांचा महाराष्ट्र काँग्रेसचे कार्याध्यक्ष कुणाल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

महाराष्ट्र शासनातर्फे धुळ्याची दिव्यांग खेळाडू वैष्णवी मोरे यांना पॅरो ज्युदो या खेळ प्रकारात शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार धुळ्यातील खेळाडूला मिळाल्याबद्दल प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष पाटील यांनी पुरस्कार प्राप्त खेळाडू मोरे यांचा सत्कार केला. वैष्णवी मोरे हिने जवळजवळ सात देशांमध्ये महाराष्ट्र आणि भारताचे कुस्ती व ज्युदो खेळात प्रतिनिधित्व केले आहे. एसएसव्हीपीएस कला महाविद्यालयात प्रथम वर्षात वैष्णवी मोरे शिकत आहेत. सत्कारावेळी एसएसव्हीपीएस कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्र वाघ, डॉ. नरेश बागल, डॉ. जितेंद्र तलवारे, गौरव मोरे उपस्थित होते.

## चिलारे शिवारात गांजा जप्तीची मोठी कारवाई

**प्रतिनिधी । शिरपूर**

तालुक्यातील चिलारे शिवारात धुळे येथील स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने गांजा जप्तीची मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत तब्बल ४२ लाख ३२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार यांना याबाबत गुप्त माहिती मिळाली. रविंद्र गणेशा पावरा याने तालुक्यातील आदिवासी बहुल चिलारे गावाचे शिवारात टिटवा गावाच्या रस्त्यावरील शेतातील घरात मानवी मेंदुवर विपरीत परिणाम घडवून आण्णारा अंमली पदार्थ (गांजा) अवैधरित्या साठा करून विक्री करण्याच्या उद्देशाने अवैध साठा करून कब्जात ठेवला आहे.अशी माहिती मिळाली. त्यानुसार पो.नि. श्रीराम पवार यांनी स्थानिक गुन्हे शाखा व शिरपूर तालुका पोलीस स्टेशनचे अधिकारी तसेच अंमलदार यांचे वेगवेगळे दोन पथक तयार करून छापा टाकून कारवाईचे नियोजन केले. मानवी मेंदुवर विपरीत परिणाम घडवून आणणारा अंमली पदार्थ अवैधरित्या साठा करून ठेवलेला हिरवट पाने, बिया, फुले असा सुमारे ६०५ किलो गांजा जप्त केला आहे. ७ हजार रुपये प्रति किलो प्रमाणे जप्त केलेल्या गांजाची रक्कम ४२ लाख ३५ हजार रुपये आहे. हवालदार आरिफ पठाण यांचे तक्रारी वरून आरोपी रविंद्र गणेशा पावरा विरुध्द शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुंगीकारक औषधे द्रव्ये आणि मनोव्यापारावर परीणाम करणारे पदार्थ अधिनियमा प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

ही कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे यांचे मार्गदर्शनाखाली धुळ्याच्या स्थानिक गुन्हा शाखेचे पो. नि. श्रीराम पवार, पोउनि. अमित माळी, शिरपूरचे पीआय जयपाल हिरे, पोउनि. सुनिल बसावे, स्थागुशाचे हवालदार आरीफ पठाण, पवन गवळी, पंकज खैरमोडे, पो.कॉ. मयूर पाटील, योगेश जगताप, जगदीश सुर्यवंशी, कमलेश सुर्यवंशी, राहुल गिरी, चालक गिते, गुलाब पाटील तसेच तालुका पोलिस ठाण्यातील हवालदार राजू ढिसले, पोकॉ प्रकाश भिल, ग्यानसिंग पावरा, रोहिदास पावरा यांनी केली.

## बोधकथा

### राजा ने केला न्याय

अनेक वर्षांपूर्वी हुकालाल नावाचा कुख्यात दरोडेखार होऊन गेला. सिंधुराज राजाच्या राज्यात त्याने लोकांचे जगणे मुश्किल करून टाकले होते. तो श्रीमंतांना तर लुटत असेच, परंतु गरिबांनाही सोडत नसे. गोरगरीब शेतकरी, कामगारांनी आयुष्यभर कष्ट करून कमावलेले चार पैसे हडप करण्यास तो जराही संकोच बाळगत नसे. लोक त्याला हात जोडून विनवण्या करत असत. परंतु त्याला तो मुळीच भीक घालत नसे. अत्यंत निर्दयीपणे त्याचा लूटमारीचा धंदा सुरूच होता व त्याचे क्रौर्य दिवसेंदिवस वाढत होते. हजारो निरपराध लोकांच्या त्याने हत्या केल्या. जो कुणी त्याला विरोध करील, त्याला क्षमा करणे तर दूरच, त्यांना तो जिवंत सोडत नसे. सिंधुराज राजासमोर नागरिकांनी एकत्रितरीत्या हुकालालविरोधात तक्रार केली. त्यानंतर राजाने सगळी सेना त्या दरोडेखोराच्या मागावर सोडली. हुकालाल अनेक महिने सैन्याला चकवा देऊन धुमाकूळ घालतच राहिला. परंतु त्याला पकडण्यात सैनिकांना एके दिवशी यश आलेच. त्याला राजासमोर हजर करण्यात आले. राजाने त्याला ताबडतोब फासावर लटकवण्याची आज्ञा दिली. हुकालाल ला झालेली शिक्षा ऐकून त्याचे अनेक नातेवाईकही त्याला येऊन भेटायला आले. त्याची आई देखील त्याला भेटण्यास आली. परंतु आई सोडून तो सर्वांना भेटला. आईला मात्र त्याने भेट नाकारली. याचे कारण विचारले असता तो म्हणाला, लहानपणी मी सर्वप्रथम एक सुवर्णमुद्रा चोरली होती. ही चोरलेली मुद्रा मी आईला नेऊन दिली. त्या वेळी तिने माझी प्रशंसा केली, माझ्या पाठीवर शाबासकीची थाप मारली. जर तिने मला त्याच दिवशी फटकारले असते, चापट मारली असती तर हे दिवस पाहावे लागले नसते व मी दरोडेखोरही झालो नसतो.



**तात्पर्य :- पाया मजबूत आहे की ठिसूळ यावरच इमारत किती मजबूत असेल हे ठरत असते. तशाच प्रकारे मुलांवर लहानपणीच चांगले संस्कार केले गेले तर त्याच्या चांगल्या चारित्र्याचा पाया रचला जातो. वाईट संस्कार माणसाला अधोगतीच्या मार्गावर घेऊन जाण्यास कारणीभूत ठरतो.**

## राशिभविष्य

**मेष** : आज तुम्हाला कामाच्या ठिकाणी प्रयत्नांचा फायदा मिळेल. स्वतःवर विश्वास ठेवा. कामाच्या ठिकाणी तुमचं काम नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडणे शुभ राहील.

**वृषभ** : आज तुम्हाला आर्थिक बाबींमध्ये पूर्ण यश मिळेल. लपलेल्या शत्रूंमुळे व्यवसायात नुकसान होऊ शकते.

**मिथुन** : आज घरातील समस्या सुटतील. प्रेमसंबंध असतील. तुम्हाला खास कामासाठी कुठेतरी जावे लागेल. तुमच्या अचूकतेबाबत काही समस्या उद्भवू शकतात.

**कर्क** : आज तुम्हाला कामावर किंवा घरी तुमच्या कुटुंबासह खूप अनावश्यक धावपळ करावी लागेल. ज्यामुळे शारीरिक आणि मानसिक त्रास होऊ शकतो. प्रवास करताना खाण्यापिण्याबाबत विशेष काळजी घ्या. पोट आणि घशाच्या आजारांपासून सावध रहा.

**सिंह** : आज कामाच्या ठिकाणी प्रचंड धावपळ होईल. प्रवास करताना तुमच्या मौल्यवान वस्तूंची विशेष काळजी घ्या. अन्यथा, तुमचे सामान हरवू शकते किंवा चोरीला जाऊ शकते. राजकारणातील तुमच्या कार्यक्षम नेतृत्वाचे कौतुक होईल. नवीन उद्योग व्यवसायाबाबत कुटुंबातील सदस्यांशी चर्चा सकारात्मक होईल.

**कन्या** : आज व्यवसायात उत्पन्नापेक्षा खर्च जास्त असेल. कोणतीही महागडी वस्तू खरेदी करण्यासाठी, तुम्हाला तुमची बचत काढून ती खर्च करावी लागू शकते. कुटुंबातील एखाद्या सदस्यावर जास्त पैसे खर्च केल्यामुळे हे घडू शकते.

**तुळ** : आज प्रेमसंबंधांमध्ये अनावश्यक मतभेद होऊ शकतात. तुमच्या बोलण्यावर आणि रागावर नियंत्रण ठेवा. आणि वेळेची नाजूकता समजून घ्या.

**वृश्चिक** : आज तुमचे आरोग्य पूर्वीपेक्षा चांगले असेल. पोटाशी संबंधित आजारांना हलके घेऊ नका. अन्यथा तुम्हाला रुग्णालयात दाखल करावे लागू शकते.

**धनु** : आज तुम्हाला कामात रस कमी वाटेल. शरीरात आळसाची भावना निर्माण होईल. राजकारणात रस वाढेल. काही काम पूर्ण करण्यात अडथळा येऊ शकतो. व्यवसायात खूप धावपळ होईल.

**मकर** : आज व्यवसायात चांगली विक्री झाल्यामुळे उत्पन्न चांगले राहील. तुम्हाला अडकलेले पैसे किंवा काम मिळू शकते.

**कुंभ** : आज प्रेमसंबंध अधिक दृढ होतील. विवाहयोग्य लोकांना लग्नाशी संबंधित चांगली बातमी मिळेल. तुमच्या प्रिय व्यक्तीला भेटून तुम्हाला आनंद होईल.

**मीन** : आज तुमचे आरोग्य चांगले राहील. बाहेरचे अन्न खाऊ नका, अन्यथा उलट्या, जुलाब, पोटदुखी होऊ शकते. हाडांशी संबंधित आजारांमुळे अधिक त्रास होऊ शकतो.

## पान १ वरुन

**मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री विरोधात......**

२१०० रुपये तर नाहीच दिले. पणं किसान सन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्या शेतकरी महिलांचे १५०० रुपये अनुदानही बंद केले. आता फक्त ५०० रुपये प्रति महिना देण्याचे जाहीर केले आहे. म्हणजेच, लाडक्या बहिणींना २१०० रुपये पणं नाही, अन् १५०० रुपये पणं नाही. आता ५०० रुपये देऊन आमची फसवणूक केल्याची तक्रार शेतकरी महिलांनी महायुती सरकारविरुद्ध श्रीरामपूर पोलिस ठाण्यात केली आहे. दरम्यान, श्रीरामपूर पोलिसांनी गुन्हे दाखल न केल्यास शेतकरी संघटना नेतृत्वाखाली राज्यभरातील शेतकरी आणि लाडक्या बहिणी ५ मे रोजी संभाजीनगर उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार आहे.

**राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार बोर्डात......**

माजी दक्षिणी आर्मी कमांडर लेफ्टनंट जनरल ए.के. सिंग आणि रिअर ॲडमिरल मोंटी खन्ना हे लष्करी सेवेतील निवृत्त अधिकारी आहेत. हे देखील मंडळाचा भाग असतील. राजीव रंजन वर्मा आणि मनमोहन सिंग हे भारतीय पोलिस सेवेतून निवृत्त झाले आहेत. बी व्यंकटेश वर्मा हे सात सदस्यांच्या मंडळावर निवृत्त परराष्ट्र सेवा अधिकारी आहेत.

**ग्रामपंचायतीने दिली गावकऱ्यांना......**

श्रीराम तांदूळ, तृतीय क्रअमांकला कुटुंबातील ५ लोकांना अभयारण्याची सफारी, चौथा क्रमांकाला २० किलो तुरीची डाळ, पाचव्या क्रमांकला एक टिन खादय तेल आणि सहाव्या क्रमांकला एक चांदीचा शिक्का असे बक्षीस देण्याचा निर्णय ग्रामपंचायतने घेतला आहे. . गाव लागले कामाला सर्व कर भरणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला मोफत कणिक दळून दिली जाईल. मोफत आरोचे शुद्ध पाणी सुद्धा देण्यात येणार आहे. त्यामुळे या ग्रामपंचायत अंतर्गत चारही गावातील कुटुंब आता संपूर्ण कर भरण्याच्या तयारीला लागले असून त्यांच्यात स्पर्धा निर्माण झाली आहे. ग्रामपंचायतचा हा निर्णय गावाच्या विकासात एक पाऊल पुढे नेणारा ठरल्याने सर्वत्र या उपक्रमाचे कौतुक होत आहे.


हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक सागर काशिनाथ ओतारी व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई -१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक - राजेंद्र राधाकिसन शर्मा (मोबा. - ९४२२७८४३३६) (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) E-Mail : dainikshauryamarathi@gmail.com

## जय... जय... महाराष्ट्र माझा




**जळगाव ।** आज १ मे म्हणजेच महाराष्ट्र व कामगार दिन. या निमित्त ओरिऑन इंग्लिश मीडियम स्कूलचे कला शिक्षक युवराज आत्माराम वांगेकर यांनी रंगीत खडूंचा वापर करून जगाचा पोशिंदा शेतकरी व छत्रपती शिवाजी महाराज यांचे सुंदर असे चित्र फलकावर रेखाटले आहे. त्यांनी काढलेले हे चित्र सर्वांचे लक्ष वेधून घेत असून **'दैनिक शौर्य मराठी'**च्या वाचकांसाठी खास उपलब्ध करुन दिले आहे.

# अक्षय्य तृतीयेला करोडोंची उलाढाल

## सोने-चांदी, वाहन खरेदीसह गृहप्रवेशाचा साधला मुहूर्त

**जळगाव । प्रतिनिधी**

**शहरातील सुभाष चौक,भवानी पेठ ते महात्मा गांधी मार्केट परिसरातील प्रमुख बाजारपेठेत बुधवारी सकाळपासून अक्षय तृतीयेच्या खरेदीसाठी नागरिकांची प्रचंड गर्दी होती. अक्षय तृतीयेचा मुहूर्त साधत अनेकांनी सोने-चांदी तसेच वाहन खरेदीचा मुहूर्त साधला. त्यामुळे जळगावच्या बाजारपेठेत करोडो रुपयांची उलाढाल झाल्याचा अंदाज व्यावसायिकांनी वर्तविला.**

अक्षय्य तृतीया सणानिमित्त बुधवारी (दि.३०) घागर, आंबे, खरबूज व इतर साहित्याच्या खरेदीसाठी नागरिकांनी चौकाचौकांत प्रचंड गर्दी केली होती. शहरातील मुख्य बाजारपेठेत १ लाख घागरींची बाजारात विक्री झाल्याचा अंदाज विक्रेत्यांनी वर्तविला. तसेच अक्षय तृतीयेला सोने-चांदी यासह विविध वस्तू खरेदी सोबत घर खरेदी करण्याचा महुर्त देखील साधला. २०० जणांनी नवीन घरांत गृहप्रवेश केला.





**अक्षय्य तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर आर.सी. बाफना नेत्रपेढीत सोने खरेदीसाठी झालेली गर्दी. दुसऱ्या छायाचित्रात भंगाळे गोल्डमध्ये सोने खरेदी करतांना महिला.**

### पुरणपोळीला मागणी

अक्षय तृतीयेच्या दिवशी पितरांना आंबाच्या रस व पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला जातो. पुरणपोळी प्रत्येकालाच बनविता येत नसल्याने तसेच वेळेअभावी शहरात अनेक ठिकाणी पुरणपोळी विक्रीसाठी स्टॉल लावण्यात आले होते. अनेक महिला बचत गटांकडून पुरणपोळी बनवून विक्री करण्यात आली. पुरणपोळी ७० ते ८० रुपयांपर्यंत विक्री केली जात होती. त्यामुळे या ठिकाणी खरेदीसाठी गर्दी झाली होती.

### ४०० नवीन वाहनांची विक्री...

साडेतीन मुहूर्तापैकी एक असलेल्या अक्षय तृतीयेच्या सणाला वाहनांचीदेखील मोठ्या प्रमाणात खरेदी झाली. अनेकांनी आधीच वाहने बुक करून अक्षय तृतीयेला नवीन ाहन घरी घेऊन जाण्याचे नियोजन केले होते. त्यामुळे वाहन बाजारात मोठी उलाढाल झाली.

### घागर भरून पूर्वजांचे केले स्मरण

अक्षय्य तृतीये अनेकांनी घागर भरणी करून पूर्वजांचे स्मरण केले. घरोघरी अक्षयघट म्हणजे पाण्याची घागर भरून त्यावर लोटा ठेवण्यात आला. त्या लोटल्यावर आणि खरबूज ठेवून सांजोऱ्या, दोन आंबे, पुराण पोळीचा नैवेद्य दाखवून पितरांचा तर्पणविधी करण्यात आला. तसेच आपल्या पूर्वजांच्या आठवणींना उजाळा दिला.

## थोडक्यात

### जळगावला थांबणार अमृत भारत एक्स्प्रेस

**जळगाव ।** मध्य रेल्वेकडून प्रवाशांच्या सोयीसाठी लोकमान्य टिळक टर्मिनस ते सहरसा दरम्यान नवीन साप्ताहिक अमृत भारत एक्स्प्रेस सुरू करत आहे. शुक्रवारी (दि.२) या गाडीचा शुभारंभ होईल. या गाडीला जळगावसह भुसावळ येथे थांबा आहे. ११०१५ क्रमांकाची गाडी एलटीटी येथून दर शुक्रवारी दुपारी १२ वाजता सुटून रविवारी दुपारी २ वाजता सहरसा येथे पोहोचेल. परतीच्या प्रवासात ११०१६ क्रमांकाची गाडी सहरसा येथून दर रविवारी पहाटे ४.२० वाजता सुटून दुसऱ्या दिवशी म्हणजेच सोमवारी दुपारी ३.४५ वाजता लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथे पोहोचेल.

### कमी दाबाच्या वीज पुरवठ्याने नागरिक त्रस्त

**जळगाव ।** तापमान वाढीमुळे उकाळा वाढला आहे. त्यातच कमी दाबाने वीज पुरवठा होत आहे. त्यामुळे पंखे, कुलर, एसी काम करीत नसल्याने उकाळ्यात आणखी भर पडत आहे. रात्री वीजपुरवठा खंडीत होत आहे.

# महापालिकेकडून ई-निविदा प्रक्रिया मॅनेज

## रमेश पाटील यांचा पत्रकार परिषदेत आरोप

**जळगाव । प्रतिनिधी**

महापालिकेमध्ये एक वर्षांपासून टेंडर प्रक्रिया पूर्ण करूनही अद्यापपर्यंत श्री बालाजी इन्फ्रास्ट्रकचरला वर्क ऑर्डर दिलेली नाही. मात्र, इतरांकडून कोणतेही कागदपत्रांची पूर्तता न करता त्यांना टेंडर दिले जातात. मनपा अधिकारी ई-निविदा प्रक्रिया राबवितांना मॅनेज करीत असल्याचा आरोप रमेश पाटील यांनी बुधवारी पद्मालय विश्राम गृहात आयोजित पत्रकार परिषदेत केला.

यावेळी निलेश पाटील उपस्थित होते. रमेश पाटील पुढे म्हणाले की, महापालिकेत टेंडरसह इतर कामांच्या नावाखाली सावळा गोंधळ सुरु आहे. बांधकाम विभागाच्या निविदामध्ये डांबर प्लांट नाहीत, पेव्हर सुविधा नाही तरीही त्यांची टेंडर मॅनेज करण्याची प्रक्रिया राबविली जात असून यासंदर्भात माहिती अधिकार कायद्याअंतर्गत मनपाकडे मागितलेली माहिती दिली जात नाही.

कागदपत्रांची लपवालपवी करीत असल्याचे सांगून मनीष अमृतकर हे शहर अभियंता पदासाठी पात्र नसतांना मागासवर्गीय व्यक्तीला डावलून त्या पदावर बसविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. महापालिका आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे व इतरांनी १०० कोटी रुपये खाजगी बँकेत वर्ग करून कमी व्याज दराने देण्यामागचा हेतू काय असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

दरम्यान, श्री बालाजी इन्फ्रास्ट्रकचरला एल वन घोषित करून नऊ कामांमध्ये अपात्र दाखवण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आहे. या विरोधात छत्रपती संभाजीनगर खंडपीठात याचिका दाखल केली आहे. त्यावर ३० एप्रिल रोजी सुनावणी होती. मात्र, तक्रारदाराला मनपाकडून माहिती दिली जात नाही. आता मनपा आयुक्त व अतिरिक्त आयुक्त यांच्या सह इतर अधिकाऱ्यांविरोधात फौजदारी खटला व १० कोटींचा दावा दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

## दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयाचा शुभारंभ

**जळगाव । प्रतिनिधी**

नव्याने स्थापन करण्यात आलेल्या 'जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय'चा शुभारंभ दि.१ मे रोजी सकाळी १०.१५ वाजता करण्यात येणार आहे. या कार्यालयाचे उद्घाटन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्याहस्ते होणार आहे. यामुळे दिव्यांगांना उपयुक्त निर्णय आणि सेवा एका ठिकाणी उपलब्ध होतील. शैक्षणिक, आर्थिक, आरोग्य, पुनर्वसन व अन्य सवलतींचा लाभ सुलभपणे मिळणार आहे.

# ५३ लाखांत फसवणूक करणाऱ्या तिघांना अटक

**जळगाव । प्रतिनिधी**

शहरातील एकास १० जून ते ३१ जुलै २०२४ दरम्यान वेगवेगळया व्हॉट्सअॅप क्रमांकावरून गुंतवणुकीचे आमिष देत मिळालेल्या नफ्यातून २० टक्के नफा धर्मादाय संस्थेला देण्याचे आमिष देवून ५३ लाख ६५ हजारांची ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या ७ आरोपींपैकी ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

शहरातील एकास १० जून ते ३१ जुलै २०२४ दरम्यान वेगवेगळ्या व्हॉट्सअॅप क्रमांकावरून गुंतवणुकीचे आमीष देत अमित मालविय, आदित्य जैन, विजयकुमार असे नाव सांगणाऱ्या इसमांनी एलिट प्रकल्प योजनेत सहभागी होण्यासाठी गुंतवणूक करण्याचे आमिष दाखवून त्यातील काही सदस्यांची निवड करून सदर ट्रेडिंग तिकिटे मिळवून नफा कमावल्यानंतर आम्हाला धर्मदाय अधिक चांगल्याप्रकारे विकसीत करण्यास मदत करण्यासाठी गुंतवणूकदारांनी २० टक्के रक्कम आमच्या धन सिक्युरिटीज या धर्मदाय संस्थेला दान करावे लागेल, असे आमिष देवून ५३ लाख ६० हजारांची फसवणूक केली होती. यात सायबर पोलिसांनी ७ आरोपी निष्पन्न केले आहेत. त्यातील तिघांच्या मुसक्या आवळण्यात यश आले आहे.

तपास पथकाने कांजीभाई भिकाभाई जाधव (वय-४२) याच्यासह तिघांना २९ एप्रिल रोजी अटक केली आहे. त्यास न्यायालयाने ४ दिवसांची पोलिस कोठडी दिली आहे. पुढील तपास सायबर पोलिस करीत आहेत.

# जिल्ह्यातील १० पोलिसांना महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर

**जळगाव । प्रतिनिधी**

पोलिस प्रशासनात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी जिल्ह्यातील १० पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलिस महासंचालक सन्मानचिन्ह जाहीर करण्यात आले आहे. पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी ही घोषणा केली.

जिल्ह्यातील सहाय्यक पोलिस निरीक्षक शामकांत पाटील, जगन्नाथ पाटील, पोलिस हवालदार रमेश शंकर कुमावत, हरिश मधुकर कोळी, जितेंद्र राजाराम पाटील, गोरखनाथ रामभाऊ बागुल, विनोद बळीराम पाटील, दिलीप लक्ष्मीकांत कुलकर्णी, आशिष प्रतापराव चौधरी व पोलिस शिपाई जागृती चंद्रशेखर काळे या १० जणांचा यात समावेश आहे. पोलिस दलात कार्यरत असताना, केलेल्या उत्तम कामगिरी व प्रशंसनीय सेवेबद्दल हे सन्मानचिन्ह दिले जाते.

# रक्तदात्यांचा होणार 'रक्तमित्र'ने सन्मान

## रक्तदाता असोसिएशनचा उपक्रम; अर्जाचे आवाहन

**जळगाव । प्रतिनिधी**

जळगाव जिल्हा रक्तदाता असोसिएशनतर्फे २५ पेक्षा अधिक वेळा रक्तदान करणाऱ्या समर्पित रक्तदात्यांचा 'रक्तमित्र'म्हणून गौरव करण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुक रक्तदात्यांनी आपली माहिती आणि रक्तदानाचा तपशील असोसिएशनच्या गणपती नगरातील कार्यालयात प्रत्यक्ष सादर करावा, असे आवाहन असोसिएशनतर्फे करण्यात आले आहे.

इच्छुकांना दि.१ मे ते १३ जूनदरम्यान अर्ज सादर करता येणार आहेत. अर्ज सादर करताना




ओळखपत्राची प्रत, रक्तदानाची संख्या दर्शवणारा पुरावा तसेच संपर्क क्रमांक देणे आवश्यक आहे. हा उपक्रम जिल्ह्यातील निस्वार्थ रक्तदात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येत असल्याचे असोसिएशनचे विश्वस्त श्रीकृष्ण मेंगडे यांनी सांगितले. जास्तीत जास्त रक्तदात्यांनी या उपक्रमात सहभाग घ्यावा. अधिक माहितीसाठी जळगाव जिल्हा रक्तदाता असोसिएशन, ४ मुळे कॉम्प्लेक्स, स्टँडर्ड चार्टर्ड बँकेच्या बाजूला, गणपती नगर येथे संपर्क साधावा, असे आवाहन जळगाव जिल्हा रक्तदाता असोसिएशनच्यावतीने करण्यात आले आहे.

# वैद्यकीय महाविद्यालयात ३ ला एमआरआय मशिनचे लोकार्पण

**जळगाव । प्रतिनिधी**

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात रुग्णांसाठी अत्याधुनिक ३ टी एमआरआय मशिनचा लोकार्पण सोहळा ३ मे रोजी सकाळी १०.३० वाजता मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.


पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते या एमआरआय मशीनचे उद्घाटन होणार आहे. यावेळी जलसंपदामंत्री गिरीश महाजन, केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे, सामाजिक न्याय अल्पसंख्याक विकास मंत्रालयाच्या माधुरी मिसाळ, खा.स्मिता वाघ, आ.सुरेश भोळे, आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे, आ. एकनाथ खडसे, आ.किशोर पाटील, आ. मंगश चव्हाण,आ. चंद्रकात पाटील, आ.अमोल पाटील, आ.सत्यजित तांबे, आ. अनिल पाटील, आ.अमोल जावळ उपस्थित राहणार आहेत.

# अनुभूती निवासी स्कूलचा १०० टक्के निकाल

**जळगाव । प्रतिनिधी**

कौन्सिल फॉर द इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनिशन्स अर्थात सीआयएससीईच्या दहावी व बारावी निकाल बुधवारी (दि.३०) जाहिर करण्यात आला. त्यात अनुभूती निवासी स्कूलच्या स्थापनेपासून ते आतापर्यंत १०० टक्के निकालाची परंपरा यावर्षीसुद्धा कायम राहिली आहे.

क्रिषा राठोड ही ९५ टक्के गुणांसह पहिली आली आहे. तर आरोही रघुनाथ परांजपे ९३.२५ टक्के गुणांसह द्वितीय तर शाल्मली शैलेंद्र अलमन ९२.२५ तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. यामध्ये ९० टक्यांच्यावर सहा तर ८० ते ९० टक्क्यांमध्ये तीन विद्यार्थ्यांचा समावेश आहे.



> "श्रद्धेय भवरलालजी जैन यांच्या विचारांवर आधारित शैक्षणिक मूल्य जपणाऱ्या अनुभूती निवासी स्कूलच्या स्थापनेपासून विद्यार्थ्यांनी यंदाही १०० टक्के निकाल राखला. या सुयशाबद्दल सर्व विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन! देशाचे उज्वल भविष्य विद्यार्थ्यांमध्ये असून निसर्गरम्य वातावरण, स्पर्धात्मक जगाशी सामना करण्याची ताकद अनुभूतीच्या विद्यार्थ्यांत आहे.
>
> – **अशोक जैन**, अध्यक्ष, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.

# बालकांच्या मधुमेह तपासणीसाठी व्हील फाउंडेशनशी करार

## जि.प. सीईओ मीनल करनवाल यांची पत्रकार परिषदेत माहिती; पालकांनीही आहाराकडे लक्ष देण्याचे आवाहन

**प्रतिनिधी । जळगाव**

**बदलत्या जीवनशैलीमुळे आहार विहाराचे प्रमाण बदलले आहेत. यामुळे दिवसेंदिवस आरोग्यावर होणाऱ्या परिणामाची माहिती जाणून घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून प्रायोगिक तत्त्वावर धरणगाव तालुक्यातील पिंप्री येथील प्राथमिक शाळेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांच्या रक्ताच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली. यात जवळपास ५५ ते ६० बालकांना मधुमेह सदृश्यची लक्षणे आढळून आली होती. त्या पार्श्वभूमीवर दिल्ली येथील व्हील ग्लोबल फाउंडेशन या संस्थेशी जिल्हा परिषदेने करार करून या पुढच्या काळात आहार आणि आरोग्य संदर्भात जनजागृती करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी बुधवारी (दि.३०) पत्रकार परिषदेत दिली.**

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सचिन भायेकर, धरणगाव येथील तालुका आरोग्य अधिकारी संजय चव्हाण उपस्थित होते. सीईओ करनवाल पुढे म्हणाल्या की, महिला आणि



बालकांच्या आहाराचे बदलणारे प्रमाण दिवसेंदिवस बदलत आहे. या बदलत्या जीवनशैली सोबतच आहारातील जंक फ ूडचे प्रमाण वाढत असल्याने त्याचा आरोग्यावर मोठ्या प्रमाणात परिणाम होत आहे. ही बाब मोठी समस्या बनली असली तरी बालकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम रोखण्याच्या दृष्टिकोनातून प्रायोगिक तत्त्वावर जिल्ह्यातील एका शाळेची निवड करून तेथील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांच्या रक्त नमुन्यांची तपासणी करण्यात आली.

या तपासणीदरम्यान मोठ्या प्रमाणात बालके ही मधुमेहाची लागण होण्याच्या उंबरठ्यावर असल्याचे दिसून आले. त्यामुळे प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आलेल्या तपासणीतून निघालेला निष्कर्ष बघता जिल्हाभरात आहार आणि आरोग्यसंदर्भात जनजागृती करण्याची आवश्यकता आहे.

यामुळे जळगाव जिल्हा परिषदेने व्हील फाउंडेशन या संस्थेसोबत करार करून जिल्हाभरात शाळा आणि नागरिकांमध्ये आहार आणि आरोग्यसंदर्भात जनजागृतीसाठी विशेष मोहीम हाती घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, पालकांनी देखील आपल्या पाल्यांच्या आहारावर लक्ष ठेवून काळजी घेणे देखील गरजेचे असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी करनवाल यांनी सांगितले.

### जि.प. राबवणार तपासणी मोहीम

विद्यार्थ्यांचे आरोग्य चांगले राहावे म्हणून पुढील काळात शाळा सुरू झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर विद्यार्थ्यांच्या रक्त तपासणी करण्याची मोहीम सुरू करण्यात येणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी यावेळी सांगितले.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते अमोल पढार यांचा गौरव



**जळगाव । प्रतिनिधी**

'आपली सेवा आमचे कर्तव्य' असे सांगणाऱ्या लोकसेवा हक्क कायद्याच्या अंमलबजावणीस सोमवारी (दि.२८) दहा वर्ष पूर्ण झाल्याने हा दिवस सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमात उल्लेखनिय कार्य केल्याबद्दल आराध्या महा ई-सेवा केंद्राचे संचालक अमोल पढार यांचा जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांच्याहस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र पाटोळे, तहसीलदार शितल राजपूत, नायब तहसीलदार राहुल वाघ आदी मान्यवर उपस्थित होते.

# जिल्ह्यातील १ हजार ७९१ गावांत झाली पशुगणना पूर्ण

## • जिल्हाभरात २७७ प्रगणक , ४९ पर्यवेक्षकांनी केले पशुगणनेचे काम

**प्रतिनिधी । जळगाव**

जिल्ह्यातील १७९१ गावांत पशू गणना करण्यात आली. १५ फेब्रुवारी ते ३० एप्रिल या काळात ही गणना झाली. संपूर्ण जिल्ह्यातील २७७ प्रगणक व ४९ पर्यवेक्षकांनी या पशु गणनेचे काम केले.



सर्वसाधारणपणे दीड महिना प्रगणकांनी हे काम केले. जिल्ह्यातील २१ वी पशुगणनेचे काम पूर्ण झाले असून साधारणपणे महिन्याभरानंतर राज्यासह जिल्ह्यातील पशुधनाची माहिती उपलब्ध होऊ शकणार आहे. त्यानंतर जिल्ह्यात नेमके किती पशुधन घटले आणि वाढले, याचे चित्र स्पष्ट होणार आहे. पशुगणनेसाठी जिल्ह्यात २७७ प्रगणक व ४९ पर्यवेक्षकांची नेमणूक केली होती. ही पशुगणना पहिल्यांदाच ऑनलाईन अर्थात अॅपद्वारे करण्यात आली. पशुगणनेमुळे जिल्ह्यातील पशुधनाची संख्या निर्धारित होऊन त्यानुसार राज्य शासनाला धोरण आखून योजनांची सुसूत्रता करता येणार आहे. यात १६ पशुधन जाती, कुक्कुटपक्षी यांची प्रजातीनिहाय वयोगट तसेच लिंगनिहाय माहिती संकलित केली आहे. एप्रिलपर्यंतच पूर्ण केले होते. राज्याच्या १०० दिवस कार्यक्रमांतर्गत पशुसंवर्धन विभागाने २१ व्या पशुगणनेचा अंतर्भाव केला होता. त्यानुसार जिल्ह्यात पशुगणना करण्यात आली. २१ वी पशुगणना पूर्ण झालेली आहे. मात्र या गणनेची अधिकृत माहिती ही शासनस्तरावर आहे. शासनाकडून जिल्ह्याची आकडेवारी जाहीर करण्यात येणार आहे. पशुगणननेमुळे जिल्ह्यातील पशुधनाची संख्या निर्धारित होऊन त्यानुसार राज्य सरकारला धोरण आखता येईल. तसेच योजनांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी पशुगणना केली जात आहे.

जिल्ह्यात पशुगणनेचे काम पूर्ण झाले असून १५ फेब्रुवारी ते ३० मार्चदरम्यान ही प्रक्रिया राबविण्यात आली होती. जिल्ह्यात २७७ प्रगणक व ४९ पर्यवेक्षकांनी या पशुगणनेचे काम केले. पशुधनाची आकडेवारी शासनाकडून लवकरच जाहिर करण्यात येणार आहे.

**– डॉ. वाहिद तडवी,**
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव

### • जिल्ह्यातील मागील पशुगणना आकडेवारी

जिल्ह्यात २०१९ मध्ये २० वी पशुगणना झाली. तेव्हा गाय वर्ग ३ लाख ५४ हजार ५४४, म्हैस वर्ग २७ हजार ६५९, मेंढ्या ४ लाख २२ हजार ६३२, शेळ्या ३ लाख ३२ हजार ४१, वराह ९ हजार ११६, घोडे २०७, गाढवे ७४, कुक्कुट पक्षी २० लाख ५७ हजार २५ असे एकूण २८ लाख ८२ हजार २९८ इतके पशुधन होते. यात मात्र आता वाढ होणार आहे. गावे, वॉर्ड येथे जिल्हाभरात प्रगणकांनी फिरून ही पशुगणना केली आहे. यासाठी जिल्ह्यात १५० प्रगणक आणि ३५ पर्यवेक्षक नियुक्त करण्यात आले होते. लवकरच या पशुगणनेची आकडेवारी उपलब्ध होणार आहे.

## रावेरात गुन्हेगारीवर बसवली पो.नि.जयस्वालांनी जरब

**प्रतिनिधी । रावेर**



रावेर शहर अतिसंवेदनशिल आहे. येथे पोलीस स्टेशनला पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल रुजू झाल्यापासून गुन्हेगारीत लक्षणीय घट झाली आहे.

रावेर शहर संवेदनशील आहे. मात्र, पोलीस निरीक्षक डॉ. विशाल जयस्वाल यांनी रावेर पोलिस स्टेशनचा कार्यभार सांभाळल्यापासून शहर व परिसरात गुन्हेगारीच्या प्रमाणात लक्षणीय घट झाल्याचे दिसून येत आहे. श्रीराम नवमी उत्सवानिमित्ताने श्रीरामाची मिरवणूक मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. त्यांनी शांततेत मिरवणूक पार पाडली. या मिरवणुकीमध्ये वयोवृद्धापासून तरुणांचा समावेश होता.

## थोडक्यात

### अमळनेरात निवासी बालवारकरी शिबीर

**अमळनेर ।** शहरातील डेकू रोड भागातील वैकुंठनिवासी गुरुवर्य श्री मोठेबाबा स्मृती मंदिरातर्फे २ ते १२ मे दरम्यान निवासी अध्यात्मिक बालवारकरी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याशिबिरात बालवारकऱ्यांना गीतेचे श्लोक, हरिपाठ, भजन, अभंग, हनुमान चालिसा, धार्मिक स्तोत्र, टाळ वाचन, पखवाज वादन, दिंडी पाऊली, योगासन, धार्मिक कथा आदींचे अध्यात्मिक ज्ञानाचे सुसंस्कार देण्यात येणार आहे. शिबिरात गजानन महाराज (आळंदी), अशोक महाराज (लोंढवे), बबन महाराज (पिंपळेसिम) यांचे मागदर्शन लाभणार आहे. वय वर्ष ८ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळणार आहे. पालकांनी मुलांना या शिबिरात सहभागी करावे, तत्काळ नाव नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### वृक्षतोडीसंदर्भात आ.जावळेंना निवेदन

**रावेर ।** तालुक्यातील सातपुडा परिसरातील बेकायदेशीर होत असलेल्या वृक्षांच्या कत्तलीबाबत वनरक्षक लक्ष देत नसल्याने वृक्षप्रेमी आ.अमोल जावळे यांना निवेदन देणार आहेत.

सातपुडा पर्वतासह रावेर परिसरात अनेक वर्षापासून तरुण वृक्षांची कत्तल होत असल्याने पर्यावरण धोक्यात आले आहे. परिसरात तरुण वृक्ष सर्रासपणे कत्तल करून मध्य प्रदेशात दररोज मोठ्या प्रमाणात १० ते १५ ट्रकने वाहतूक केली जात आहे.

तरुण वृक्षांची कत्तल थांबवावी व वृक्षतोड करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई व्हावी,तसेच पर्यावरणाचे संरक्षण करण्यात यावे. याकडे वन क्षेत्रपाल अजय बावणे डोळेझाक करीत असल्याने आमदार अमोल जावळे यांना शहरातील पर्यावरणप्रेमी निवेदन देणार आहेत.

## ३३ दिव्यांगांना कृत्रिम हात, पायांचे मिळाले बळ

**प्रतिनिधी । अमळनेर**

देवगिरी प्रांत, केशव प्रतिष्ठान व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने अमळनेर तालुक्यातील ५३ दिव्यांग बांधवांची तपासणी करुन ३३ जणांना खा. स्मिता वाघ यांच्या हस्ते कृत्रिम पाय व हात अशा अवयवांचे वाटप करण्यात आले.

दिव्यांग बांधवांना हात, पायअभावी येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी, तसेच त्यांनाही सर्वसामान्य व्यक्तींप्रमाणे समाजात वावरता यावे, यासाठी २८ रोजी येथील पीवीए इंग्लिश मीडियम स्कूलच्या रोटरी हॉलमध्ये दिव्यांग बांधवांचे मोफत तपासणी शिबीर



घेण्यात आले. याच ठिकाणी दिव्यांग बांधवांच्या हाता, पायांचे मापे घेऊन मशिनरीच्या साहाय्याने योग्य क्रिया करून कृत्रिम हाता-पायांचे रोपण करण्यात आले. त्यामुळे दिव्यांग बांधवांना बळ मिळाले. तर ते त्याच ठिकाणी हातापायांची हालचाल करून चालू अन् फिरू ही लागले. या कार्यक्रमास खासदार स्मिता वाघ, ज्येष्ठ स्वयंसेवक नरेंद्र निकुंभ, प्रा.डी.डी. पाटील, आनंद माळी, सुरेंद्र साळुंखे, स्वर्णदीप राजपूत, संकल्प वैद्य, हेमंत सैंदाणे, हितेश शहा, लालचंद सैनानी, अशोक पाटील, चेतन राजपूत, राकेश पाटील उपस्थित होते.

## बोदवड येथे वर्ग खोली बांधकामाचे उद्घाटन

**प्रतिनिधी । बोदवड**

येथे वर्ग खालीचे बांधकाम करण्यात आले आहे. या वर्गखोलीचे उद्घाटन केंद्रिय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते करण्यात आले.

बोदवड येथे राष्ट्रीय शिक्षण संस्था बोदवड संचलित सर सत्यजित राम नेमाडे माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय येथे खासदार स्थानिक विकास निधी अंतर्गत मंजूर वर्ग खोली बांधकाम करणे, या विकास कामाचे उद्घाटन तसेच शाळेचे प्रथम मुख्याध्यापक आर.टी.बडगुजर यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती रक्षा खडसे यांच्या हस्ते त्यांना विद्यालयातून निरोप देण्यात आला.

## रेल्वे परिविक्षाधीन अधिकाऱ्यांसाठी विशेष सत्र

**प्रतिनिधी । भुसावळ**

भारतीय रेल्वेचे भविष्य घडवणाऱ्या भारतीय रेल्वे व्यवस्थापन सेवा परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांसाठी भुसावळ विभागात विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले. हे सत्र मंडळ रेल्वे कार्यालय येथे पार पडले.

या सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून डिआरएम श्रीमती इति पांडेय यांनी उपस्थिती लावून परिवीक्षाधीन अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी रेल्वेच्या प्रशासनिक कार्यप्रणाली, नेतृत्व कौशल्य आणि व्यावसायिक जबाबदाऱ्या याविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली. त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ ३३ परिविक्षाधीन अधिकाऱ्यांनी घेतला. हे अधिकारी सध्या झोनल प्रशिक्षण संस्थान, भुसावळ येथे त्यांच्या परिविक्षाधीन प्रशिक्षणामध्ये आहेत.

या सत्राद्वारे कार्यालयीन दैनंदिन कामकाज, विभागीय समन्वय, निर्णय प्रक्रिया आणि प्रवासी तसेच मालवाहतूक व्यवस्थापन याविषयी सखोल माहिती देण्यात आली. या सत्रात वाणिज्य आणि परिचालन विभागाचे वरिष्ठ अधिकारीही सहभागी झाले होते. त्यांनी मार्गदर्शन केले.

## एरंडोल तालुका भाजपाच्या अध्यक्षपदी योगेश देवरे

**प्रतिनिधी । एरंडोल**

येथील भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक बैठक पार पडली. यावेळी एरंडोल, विखरण ,रिंगणगावच्या तालुकाध्यक्षपदी योगेश युवराज देवरे यांची एकमताने निवड करण्यात आली. ना. गिरीश महाजन, आ. मंगेश चव्हाण, खासदार स्मितांताई वाघ, डॉ. राधेश्याम चौधरी, ज्ञानेश्वर पाटील (जळकेकर महाराज) यांच्या आदेशाने एरंडोल विखरण रिंगणगाव या मंडळ तालुकाध्यक्ष पदासाठी त्यांची निवड झाली.

## राजमाता जिजाऊ महिला मंडळातर्फे गौराई सण साजरा

**प्रतिनिधी । एरंडोल**

येथील राजमाता जिजाऊ महिला मंडळाने खान्देशी परंपरेला जपत आखाजीचा (अक्षयतृतीया) गौराईचा सण उत्साहात साजरा केला. सरस्वती कॉलनीतील प्रा. शिवाजीराव अहिरराव आणि माजी नगराध्यक्षा तथा राजमाता जिजाऊ महिला मंडळ अध्यक्षा शकुंतला अहिरराव यांच्या निवासस्थानी गौराईचा सण उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी गौराईची स्थापना करून विविध खाद्य पदार्थांच्या



माळा तयार करून तसेच सांजोरीचा नैवेद्य दाखविण्यात येवून महिला सदस्यांनी माहेरवाशिण असल्याचा आनंद घेतला. यावेळी महिला मंडळ सदस्यांनी दांडीया, झोके खेळून आनंद साजरा केला. आधीच्या काळात सासुरवाशिणीला विश्रांती मिळावी म्हणून ती आखाजी सणाची वाट पाहायची. आजच्या घडीला तोच आनंद महिलांच्या चेहऱ्यावर राजमाता जिजाऊ महिला मंडळाने दिला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शकुंतला अहिरराव, शशिकला जगताप, इंदिराताई, शकुंतला पाटील, वंदना पाटील, सुरेखा पाटील, मनिषा पाटील, प्रणाली भोसले, रूपाली पाटील, वैशाली पाटील, वेदीका पाटील यांनी परिश्रम घेतले.

## अक्षय्य तृतीयेला पुरणपोळ्या खरेदीसाठी उडाली नागरिकांची झुंबड



### • येथे मिळतात पुरणपोळ्या

खापरावरील पुरणपोळ्यांची विक्री सणाच्या दिवशी शहरातील कालंका माता मंदिर परिसर, महाबळ परिसर, गुजराल पेट्रोल पंप, दादावाडी तसेच खोटेनगर स्टॉपजवळ गरमागरम पुरणपोळ्या विकताना व बनवताना महिला दिसून येतात.

**प्रतिनिधी । जळगाव**

साडेतीन मूहुर्तापैकी एक असलेल्या अक्षय्य तृतीयेला पुरणपोळ्या खरेदीसाठी अक्षरशः झुंबड उडाली होती. ग्राहकांची वाढती गर्दी पाहुन ऐरवी ६० रुपयाला एक मिळणारी पुरणपोळी आज अक्षय्य तृतीयेला चक्क ८० रुपये नगाने विक्री होत असल्याचे दिसून आले.

अक्षय्य तृतीयानिमित्त आज घराघरात आपल्या पूर्वजांच्या नावाने घाघर भरण्याची प्रथा आहे. यासाठी आधी पुरणपोळी व आंब्याच्या रसाचा नैवद्य देण्याची प्रथा खान्देशात आहे.

यासाठी पुरणपोळ्या बाजारात विकत घेण्यासाठी मोठी गर्दी दादावाडी जवळील उड्डाणपुलाखाली झाली होती.



• खापरवरील पुरणपोळी ऐरवी ६० रुपयांना विकली जाते. परंतु आज खापरावरील पुरणपोळ्या बनवणाऱ्या महिला ८ ते १० होत्या. तर पुरणपोळ्या खरेदीसाठी १५० ते २०० नागरिक एका रांगेत पुरणपोळ्या घेण्यासाठी उभे होते. ही गर्दी दुपारी ११.३० वाजेपासून मोठ्याप्रमाणात वाढल्याने ६० रुपयांची पुरणपोळी ८० रुपयांना महिला विकत होत्या. गर्दी मोठी असल्याने पोळ्या बनवणाऱ्या महिलांच्या हातातून पैसे देऊन लोक हिसकावत होते.


# संत सखाराम महाराज यात्रोत्सवास सुरुवात

## • १२ रोजी पालखी मिरवणूक, स्तंभारोपण अन् समाधी मंदिरावर झाले ध्वजारोहण

**प्रतिनिधी । अमळनेर**

**प्रतिपंढरपूर अमळनेर येथील संत सखाराम महाराज यात्रोत्सवाला अक्षय्य तृतीयेपासून सुरुवात झाली आहे. तर ८ रोजी रथ मिरवणूक आणि १२ रोजी पालखी मिरवणूक निघणार आहे. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर ३० एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता बोरी नदीच्या वाळवंटात प्रसाद महाराज यांच्या उपस्थितीत स्तंभारोपण व समाधी मंदिरांवर ध्वजारोहण करण्यात आले.**

३० एप्रिल ते ७ मे दरम्यान दररोज सकाळी ९ ते १२ तुकाराम महाराज गाथा भजन होणार आहे. ३ ते ५ मे दरम्यान जिल्हास्तरीय भजन स्पर्धा होणार आहेत. ६ मे रोजी सखाराम महाराजांचे चवथे गादीपती प्रल्हाद महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त जयदेव बुवा गुरव यांचे कीर्तन होणार आहे. ७ रोजी सकाळी मोहन महाराज बेलापूरकर यांचे व दिंडीचे आगमन होईल. दरम्यान, रथ मिरवणुकीपासून बोरी नदीच्या वाळवंटात मोठी यात्रा भरते. विविध खाद्य पदार्थांची दुकाने, करमणुकीची साधने, पाळणे, झोके, जायंट व्हील, फुग्यांची, घरगुती वस्तूंची दुकाने थाटलेली असतात. विद्युत रोषणाईने दुकाने सजवलेली असतात. महाराष्ट्रातून लाखो भाविक या यात्रेला येतात.



८ मे रोजी वैशाख शुद्ध मोहिनी एकादशीला सायंकाळी ७.३० वाजता रथोत्सव होणार आहे. वाडी चौकातून विठ्ठल मंदिरापासून रथ मिरवणूक सराफ बाजार, दगडी दरवाजा, फरशी रोड, पैलाड मार्गे बोरी नदीतून दुसऱ्या दिवशी सकाळी रथ जागेवर येईल. या मिरवणुकीत बागलाण तालुक्यातील आदिवासी सांस्कृतिक कला मंडळाचे विशेष आकर्षण असेल. ११ रोजी संत सखाराम महाराज पुण्यतिथीनिमित्त वाडी चौकात मोफत सर्व रोग निदान शिबीर होईल. तर १२ रोजी सकाळी ६ वाजता वाडी चौकातून पालखी मिरवणूक निघेल. या मिरवणुकीत भुसावळ व चाळीसगाव येथील बँडचे विशेष आकर्षण असेल. रथ मार्गाप्रमाणेच पालखीचा मार्ग असेल. १३ रोजी मोहन बेलापूरकर महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. मात्र तरीही बोरी नदी पात्रातील यात्रा सुमारे १५ दिवस सुरूच राहते.

### • यांचे होणार कीर्तन अन् भजन

यासह मंदिर परिसरात शारंगधर देशमुख बुवा यांचे वारकरी कीर्तन, अनिता पद्माकर जोशी यांचे नारदीय कीर्तन, डॉ. प्रज्ञा देशपांडे पळसोदकर यांचे दासगणू महाराज परंपरेतील नारदीय कीर्तन, लोटांगणे महाराज यांचे भजन, सांस्कृतिक कला निकेतन यांचे संतांचे निरूपण आणि त्यांनी रचलेल्या अभंगावर कथ्थक नृत्याचा कार्यक्रम, राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त रमाकांत भालेराव यांचा नुपूर कथ्थक नृत्याचा विद्यार्थ्यांचा कार्यक्रम, बाल कीर्तनकार अग्रणी (तृप्ती) हिचा कीर्तनाचा कार्यक्रम, सखा माऊली मंडळ छत्रपती संभाजी नगर यांचा भारुड व संगीत भजनाचा कार्यक्रम होईल. किसन गोळेसर यांच्या अभंग, तर श्रीनिवास महाराज उत्राणकर यांच्या पारंपरिक भजनाचा कार्यक्रम होईल. याव्यतिरिक्त समाधी मंदिरासमोर विविध कीर्तनाचे कार्यक्रम होतील.

## किशोर पाटील यांना महाराष्ट्र सन्मान पुरस्कार

**प्रतिनिधी । अमळनेर**

जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यातील शेमळदे गावचे सुपुत्र किशोर पाटील यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल महाराष्ट्र सन्मान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार नॅशनल एज्युकेशन अँड ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन व नॅशनल एकॉनॉमिक ग्रोथ टाईम्स या राष्ट्रीय संस्थांकडून देण्यात आला.

मुंबईतील अंधेरी येथील पंचतारांकित कोहिनूर कॉन्टिनेंटल हॉटेलमध्ये झालेल्या भव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रसिद्ध हिंदी व मराठी अभिनेत्री आसावरी जोशी यांच्या हस्ते हा पुरस्कार श्री. पाटील यांना प्रदान करण्यात आला.